# मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत

# येशूचा जन्म



लेखक: Edward Hughes
रेखाचित्रकार: M. Maillot
रूपान्तरकार: E. Frischbutter; Sarah S.
अनुवादक: christian-translation.com
निर्माता: Bible for Children
www.M1914.org

BFC
PO Box 3
Winnipeg, MB R3C 2G1
Canada

©2012 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.

फार पूर्वी, ईश्वराने मेरी नावाच्या एका सुंदर तरूणीकडे गाब्रियल नावाच्या देवदूताला पाठविले. त्याने तिला सांगितले, “तुला एक मुलगा होणार, ज्याचे नाव येशू असेल. तो ईश्वराचा मुलगा म्हणून ओळखला जाणार. तो सदाकाळी शासन करेल.”



“हे कसे शक्य आहे?” आश्चर्यचकीत झालेल्या तरूणीने विचारले. “मी आजपर्यंत कोणत्याही पुरूषासमवेत राहिलेली नाही.” देवदूताने मेरीला सांगितले की हे मूल ईश्वराकडून येणार. त्याचा पिता कोणी मनुष्य असणार नाही.



देवदूताने मग मेरीला सांगितले की तिची चुलत बहिण इलिझाबेथला तिच्या म्हातारपणी मूल होणार होते. हा सुद्धा एक चमत्कारच होता. लवकरच, मेरीने इलिझाबेथची भेट घेतली. त्यांनी दोघींनी मिळून ईश्वराची प्रार्थना केली.



मेरीचे योसेफ नावाच्या
एका माणसाशी लग्न
ठरले होते. योसेफला
जेव्हा समजले की
मेरीला मूल होणार
आहे, तेव्हा तो दुः
खी झाला. त्याला
वाटले की कोणी
दूसरा पुरूष त्या
मुलाचा पिता आहे.



ईश्वराच्या देवदूताने स्वप्नात येऊन योसेफला सांगितले की हे मूल ईश्वराचे आहे. येशूचे पालन करण्यासाठी योसेफ मेरीला मदत करणार होता.



योसेफने ईश्वरावर विश्वास ठेवला व त्याची आज्ञा मानली. त्याने त्याच्या देशाचे कायदेही पाळले. नवीन कायद्यामुळे त्याने व मेरीने कर चुकता करण्यासाठी त्यांची मातृभूमी बेथलहेमकडे प्रयाण केले.



मेरी आता मूलाला जन्म
देण्यासाठी तयार होती.
पण योसेफला कोठेही
खोली मिळाली नाही.
सर्व धर्मशाळा
भरल्या होत्या.



शेवटी योसेफला एक गोठा सापडला. तिथेच बालक येशूचा जन्म झाला. त्याच्या मातेने त्याला गोठ्यातील गव्हाणीत ठेवले, जिथे सामान्यतः जनावरांना खाण्यासाठी अन्न ठेवले जाते.



जवळच, मेंढपाळ त्यांच्या झोपलेल्या मेंढ्यांचा कळप राखत होते. ईश्वराचा देवदूत प्रकट झाला व त्याने त्यांना ही गोड बातमी सांगितली.



"आज डेविडच्या ह्या शहरात तुमच्यासाठी तुमच्या तारणहाराने, येशू ख्रिस्ताने जन्म घेतला आहे. तुम्हांला ते मूल गव्हाणीत विसावलेले सापडेल."



अकस्मात, आणखीही तेजस्वी देवदूत ईश्वराची प्रार्थना करत प्रकट झाले व म्हणू लागले, “परमात्मा परमेश्वराचा जयजयकार असो, आणि पृथ्वीवर शांती वसो, मानवाचे कल्याण होवो.”



मेंढपाळ लगबगीने गोठ्याकडे गेले. मूल पाहून ते त्यांना भेटणा-या सर्वांना देवदूताने त्यांना येशूबद्दल जे सांगितले ते सांगू लागले.





चाळीस दिवसांनंतर योसेफ आणि मेरी येशूला जेरूसलेमच्या मंदिरात घेऊन आले. तिथे शिमोन नावाच्या एका माणसाने मूलासाठी ईश्वराची प्रार्थना केली, तसेच प्रभूची अन्य एक सेविका म्हातारी एनाने आभार मानले.





दोघांनाही माहित होते की येशू
ईश्वराचा पुत्र - वचनबद्ध तारणहार
आहे. योसेफने दोन पक्षांचा
बळी दिला. ईश्वराच्या
कायद्यानुसार,
गरीब जनतेने प्रभूपाशी
त्यांचे नवजात
मूल घेऊन
येताना
आणावयाची
ही भेट
होती.



काही काळानंतर
एका विशेष ता-याने
पूर्वेकडील देशीच्या
विद्वानांना
जेरूसलेमचा
रस्ता दाखविला.



“यहुद्यांचा राजा म्हणून
जन्माला आलेला तो कोठे
आहे?” त्यांनी विचारले.
“आम्हांला त्याची पूजा
करायची आहे.”

राजा हेरोदने त्या
विद्वानांविषयी ऐकले. त्रासून
त्याने त्या
विद्वानांना सांगितले की
जेव्हा त्यांना येशू सापडेल
तेव्हा त्यांनी त्याला
कळवावे. “मला सुद्धा त्याची
पूजा
करायची आहे.” हेरोद
म्हणाला. पण तो खोटे
बोलत होता. हेरोद
येशूला ठार
मारण्यास
पाहत होता.



ता-याने विद्वानांना नेमके
मेरी व योसेफ लहान मूलासह
राहत असलेल्या जागी नेले.
प्रार्थनेसाठी गुडघे टेकवून त्या
प्रवाशांनी येशूला सुवर्णाच्या
किंमती भेटवस्तू व
अत्तर भेट केले.



ईश्वराने विद्वानांना गुपचुपपणे घरी परत जाण्याची चेतावणी दिली. हेरोद संतापला होता. येशूला नष्ट करण्याच्या उद्देशाने त्याने राज्यातील सर्व बालकांना ठार केले.





पण हेरोद ईश्वराच्या
पुत्राचे काहीच वाकडे
करू शकला नाही.
स्वप्नात चेतावणी
दिल्यानुसार, योसेफ
सुरक्षेसाठी मेरी
व येशूला घेऊन
इजिप्तला गेला.



जेव्हा हेरोद मरण पावला,
तेव्हा योसेफ मेरी व येशूला घेऊन
इजिप्तहून परत आला. ते गॅलिल समुद्राच्या
जवळ असलेले छोटेसे शहर नाझारेथ मध्ये राहत होते.

# येशूचा जन्म

ईश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

प्राप्त झाली आहे

मॅथ्यू 1-2, ल्यूक 1-2

“आपल्या वाणीतून आल्यास प्रकाश देते.”
प्लाज्म 119:130

# समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर ईश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची इच्छा अशी आहे की आम्ही त्याला ओळखावे.

ईश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मृत्यू आहे, पण ईश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याने तुमच्या पापांसाठी शिक्षा मिळावी आणि क्रॉसवर मरण यावे म्हणून त्याच्या एकुलत्या पुत्राला येशूला पाठविले. नंतर येशू पुन्हा जिवंत झाला आणि स्वर्गातल्या घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

जर हे सत्य आहे यावर तुम्ही विश्वास ठेवता, तर ईश्वराला हे सांगाः

प्रिय येशू, तू ईश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मृत्यू भोगण्यास मनुष्य बनलास आणि आता तू पुन्हा जगतोस यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांसाठी मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एक दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी निघेन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.

बाइबल वाचा आणि ईश्वराशी रोज बोला! जॉन 3:16